Hindustan Times

# Pune varsity to host three-day national conference of scientists

Kimaya Boralkar
puneletters@hindustantimes.com

**PUNE:** MIT World Peace University (MIT-WPU) will host the third National Scientists Round Table Conference (NSRTC 2026) from July 17 to 19, bringing together scientists, researchers, academicians and students from across the country to discuss emerging advances in science and technology.

Held under the guidance of former CSIR director general Padma Vibhushan Raghunath A. Mashelkar, the conference aims to foster interdisciplinary collaboration and support the Viksit Bharat @2047 vision.

The three-day event will feature sessions on artificial intelligence, materials and sustainability, emerging device technologies, health sciences, and Nobel Prize-winning research, as well as poster presentations, research exhibitions, and scholar-scientist interactions.

The conference will also see the presentation of the NSRTC Awards. The Vigyan Maharshi Award 2026, carrying a cash prize of ₹5 lakh, will be conferred on Padma Vibhushan Prof. M. M. Sharma, former director of the Institute of Chemical Technology (ICT), Mumbai, for his contributions to chemical reaction engineering.

The inaugural DeepTech Young Entrepreneur Awards, each carrying ₹1 lakh, will be presented to Narayana Rao Sripada, co-founder of Swaasa, for developing an AI-based respiratory disease screening solution.

Padma and Shanti Swarup Bhatnagar awardees, research laboratory directors, senior scientists and industry leaders are expected to attend.

**EVENT WILL FEATURE SESSIONS ON AI, MATERIALS & SUSTAINABILITY, EMERGING DEVICE TECHNOLOGIES & NOBEL-WINNING RESEARCH**

THE TIMES OF INDIA

# Round table at MIT from Friday

**Pune**: MIT World Peace University will host the third edition of the National Scientists Round Table conference from July 17 to 19. The forum brings together scientists, researchers and students across disciplines.

R M Chitnis, vice-chancellor, MIT-WPU, and co-chairperson of NSRTC 2026, said the conference aims to motivate youngsters to take up research. "Our themes are divided into different verticals, but they all talk about how to think beyond what is available," said Chitnis. TNN

सकाळ

# 'एमआयटी'त शुक्रवारपासून वैज्ञानिक गोलमेज परिषद

पुणे, ता. १४ : एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीतर्फे विज्ञानातील संशोधनाला आणि चर्चेला एक नवी दिशा देणाऱ्या 'राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषदे'चे तिसरे पर्व शुक्रवार (ता. १७) ते रविवार (ता. १९) दरम्यान आयोजित केले आहे. या परिषदेत केमिकल रिॲक्शन इंजिनिअरिंग तज्ज्ञ डॉ. एम. एम. शर्मा यांना 'विज्ञान महर्षी पुरस्कारा'ने गौरविले जाणार आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. रवी चिटणीस यांनी पत्रकार परिषदेत दिली.

एमआयटीचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल व्ही. कराड यांच्या संकल्पनेतून आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, अमेरिकेतील मायक्रोलिन टेक्नॉलॉजीजचे संस्थापक डॉ. अशोक जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली परिषद होणार आहे. परिषदेत दिल्या जाणाऱ्या विज्ञान महर्षी पुरस्काराचे स्वरूप पाच लाख रुपये रोख आणि सन्मानपत्र असे असणार आहे. या परिषदेचे उद्घाटन संरक्षण संशोधन व विकास संस्थेचे माजी अध्यक्ष समीर कामत आणि 'झेन्सार टेक्नॉलॉजीज'चे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी गणेश नटराजन यांच्या उपस्थितीत शुक्रवारी (ता. १७) दुपारी चार वाजता होईल. परिषदेत यंदा नवसंशोधकांना 'डीपटेक यंग आंत्रप्रेन्युअर अवॉर्ड' प्रदान केला जाणार आहे. हा पुरस्कार 'श्वासा'चे सह-संस्थापक डॉ. नारायणराव श्रीपाद यांना कृत्रिम बुद्धिमत्तेवर चालणाऱ्या श्वसनविकार स्क्रिनिंग तंत्रज्ञानासाठी, तसेच 'सागर डिफेन्स इंजिनिअरिंग'चे संस्थापक कॅप्टन निकुंज पराशर यांना स्वदेशी रोबोटिक्स तंत्रज्ञान निर्मितीसाठी दिला जाणार आहे. प्रत्येकी एक लाख रुपये रोख आणि सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे, असे डॉ. चिटणीस यांनी सांगितले.

महाराष्ट्र टाइम्स

# 'एमआयटी वर्ल्ड'तर्फे वैज्ञानिक परिषद

पुणे : 'वैज्ञानिक क्षेत्रातील संशोधनाला दिशा देणाऱ्या 'राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषदे'चे (एनएसआरटीसी २०२६) तिसरे पर्व येत्या १७ ते १९ जुलै या कालावधीत 'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी'त होणार आहे' अशी माहिती कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस यांनी दिली. या वेळी अमेरिकेतील मायक्रोलिन टेक्नॉलॉजीजचे संस्थापक डॉ. अशोक जोशी, परिषदेचे संयोजक डॉ. भरत चौधरी उपस्थित होते. परिषद 'एमआयटी-डब्ल्यूपीयू'चे कार्याध्यक्ष डॉ. राहुल कराड आणि 'सीएसआयआर'चे माजी महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या मार्गदर्शनात होईल. 'एनएसआरटीसी'चे उद्घाटन १७ जुलैला चार वाजता एमआयटी डब्ल्युपीयूच्या आवारात होईल. 'विज्ञान महर्षी पुरस्कार जागतिक कीर्तीचे केमिकल रिएक्शन इंजिनीअरिंग तज्ज्ञ प्रा. एम. एम. शर्मा यांना अद्वितीय औद्योगिक संशोधनासाठी आणि योगदानासाठी प्रदान करण्यात येणार आहे.

नवराष्ट्र

## ‘विकसित भारत @ २०४७’साठी विज्ञान-तंत्रज्ञानावर होणार तज्ज्ञांचे विचारमंथन

# एमआयटीमध्ये उद्यापासून गोलमेज परिषद

## वैज्ञानिक दृष्टिकोनातून दिशा देण्यासाठी विविध विषयांवर चर्चा

▶ **पुणे, शहर प्रतिनिधी** वैज्ञानिक संशोधन, नवकल्पना आणि राष्ट्रनिर्मितीला चालना देण्यासाठी आयोजित करण्यात येणाऱ्या राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषदेचे (एनएसआरटी २०२६) तिसरे पर्व १७ ते १९ जुलैदरम्यान एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी (एमआयटी-डब्ल्यूपीयू), पुणे येथे होणार आहे. तीन दिवस चालणाऱ्या या परिषदेत देशभरातील नामवंत शास्त्रज्ञ, संशोधक, उद्योगतज्ज्ञ आणि विद्यार्थी सहभागी होणार आहेत.



‘विकसित भारत @ २०४७’ या संकल्पनेला वैज्ञानिक दृष्टिकोनातून दिशा देण्यासाठी विविध विषयांवर चर्चा होणार आहे. याबाबतची माहिती एमआयटी-डब्ल्यूपीयूचे कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस, डॉ. अशोक जोशी आणि परिषदेचे संयोजक डॉ. भरत चौधरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. एमआयटी-डब्ल्यूपीयूचे कार्याध्यक्ष डॉ. राहुल व्ही. कराड यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या परिषदेला पद्मविभूषण डॉ. रघुनाथ माशेलकर आणि डॉ. अशोक जोशी यांचे मार्गदर्शन लाभले आहे. परिषदेत कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम मटेरियल्स, हरित ऊर्जा, ६ जी तंत्रज्ञान, इंटरनेट ऑफ थिंग्ज, आधुनिक आरोग्य विज्ञान, बायोइन्फॉर्मेटिक्स आणि प्रगत वैद्यकीय निदान यांसारख्या विषयांवर तांत्रिक सत्रे होणार आहेत. या परिषदेला पद्मभूषण डॉ. विजय पी. भटकर, पद्मश्री प्रा. डॉ. गणपती यादव, प्रा. डॉ. शेखर मांडे, डीआरडीओचे माजी अध्यक्ष समीर कामत आणि गणेश नटराजन यांच्यासह अनेक मान्यवर वैज्ञानिक उपस्थित राहणार आहेत. दरम्यान, ‘विज्ञान महर्षी पुरस्कार २०२६’ हा ञ पद्मविभूषण प्रा. एम. एम. शर्मा यांना जाहीर करण्यात आला आहे.

प्रभात
प्रतीक बदलत्या महाराष्ट्राचे
www.dainikprabhat.com

## एमआयटी डब्ल्यूपीयूमध्ये १७ जुलैपासून

# 'राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषद'

## प्रा. एम. एम. शर्मा यांना 'विज्ञान महर्षी' पुरस्कार

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १४** - एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीच्या आवारात येत्या १७ ते १९ जुलै दरम्यान तिसऱ्या 'राष्ट्रीय वैज्ञानिक गोलमेज परिषदे'चे आयोजन करण्यात आले आहे. एमआयटीचे संस्थापक डॉ. विश्वनाथ कराड यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या या तीन दिवसीय परिषदेत देशभरातील नामवंत शास्त्रज्ञ व अभ्यासक एकत्र येणार असून, विविध प्रतिष्ठित पुरस्कारांचे वितरण केले जाईल, अशी माहिती कुलगुरू डॉ. आर. एम. चिटणीस यांनी दिली.

यंदाचा सर्वोच्च 'विज्ञान महर्षी पुरस्कार' पद्मविभूषण प्रा. एम. एम. शर्मा यांना त्यांच्या अद्वितीय औद्योगिक संशोधनासाठी प्रदान करण्यात येईल. तसेच, यंदापासून सुरू झालेला 'डीपटेक यंग आंत्रप्रेन्युअर अवॉर्ड' 'श्वासा'चे सह-संस्थापक डॉ. नारायण राव श्रीपाद आणि 'सागर डिफेन्स'चे कॅप्टन निकुंज पराशर यांना दिला जाणार आहे. या परिषदेला डॉ. विजय भटकर, डॉ. गणपती यादव आणि डॉ. शेखर मांडे यांसारखे ज्येष्ठ शास्त्रज्ञ उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.